**सरकार तर्फे फिर्याद** सोनगीर पोलीस स्टेशन जि.धुळे

दिनांक :- १९/०२/२०१९.

मी, महेश मधुकरराव भोरटेकर, वय-४६ वर्ष, पोलीस निरीक्षक, सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देतो की, मी दि. ०२/०६/२०१६ पासुन पोलीस निरीक्षक या पदावर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे कार्यरत आहे

मी, दि. १८/०२/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे कार्यालयात हजर असतांना, तक्रारदार श्री. राकेश पतिंग पाटील वय. ३० वर्षे, धंदा खाजगी व्यवसाय रा. मु.पो. वायपुर, ता. शिंदखेडा जि. धुळे यांनी ला.प्र.वि.धुळे कार्यालयात येवुन त्यांचे स्व:हस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली, त्यातील थोडक्यात मजकुर असा की, "यातील तक्रारदार यांची आई नामे सुशिलाबाई हीचे नांवे वायपुर शिवारात गट नं. १००/अ १ मध्ये १ हेक्टर २१ आर शेतजमिनीवर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०१७ मध्ये सिंचन विहीरीसाठी २,९०,०००/- रु. अनुदान मंजुर झालेले होते. त्यानुसार डिसेंबर २०१८ मध्ये जलसिंचन विहीरीचे काम पुर्ण झाल्याने सिंचन विहरीस मंजुर झालेल्या २,९०,०००/- रु. अनुदाना पैकी तक्रारदार यांचे आईस विहीर खोदकामाचे एकुण १,७६,८८०/- रु. अनुदान मिळालेले असुन विहीर बांधकामाचे उर्वरीत अुनदानाची रक्कम रु. १,१३,१२०/- थकित असल्याने तक्रारदार हे उर्वरीत अनुदानाची रक्कम लवकर मिळावी यासाठी पंचायत समिती शिंदखेडा येथील अभियंता शरद पाटील यांची भेट घेतली असता, त्यांनी सिंचन विहीर बांधकामाची उर्वरीत थकित अनुदानाची रक्कम काढुन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ४,०००/- लाचेची मागणी केलेली होती. तसेच अभियंता शरद पाटील यांनी शिंदखेडा बस स्थानकाजवळ बोलविले असल्याने व सदर कामासाठी तक्रारदार यांना अभियंता शरद पाटील यांना पैसे देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, धुळे येथे लेखी तक्रार दिली.

तक्रारदार श्री.राकेश पाटील यांचे तक्रारीचे अनुषंगाने पडताळणी करण्याकरिता मा.उप वन संरक्षक, वन विभाग, कार्यालय, धुळे यांना दोन कर्मचारी पंच साक्षीदार म्हणुन मिळणे बाबत लेखी पत्र दिल्याने (१) श्री. शशिकांत काशिनाथ भोये, लिपिक व (२) श्री. राहुल दिलीप पाटील, लिपिक, हे लेखी पत्रासह ला.प्र.वि.धुळे कार्यालयात दि.१८/०२/२०१९ रोजी हजर झाले. दोन्ही पंचांना एका तक्रारदाराकडुन शांसकीय कामाकरीता एक लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याची लेखी तक्रार दिल्याचे सांगीतले. तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई करीता पंच म्हणुन हजर राहण्याची विनंती वरून दोन्ही पंचांनी अनुमती दिली.

त्यानंतर दि.१८/०२/२०१९ रोजी शिंदखेडा येथे जावुन पडताळणी करावयाची असल्याने, आम्ही, पोलीस उप अधिक्षक श्री. सुनिल कुराडे, दोन्ही पंच व स्टाफ असे सापळा कारवाईचे साहित्यासह खाजगी वाहनाने व आमचे पाठोपाठ तक्रारदार श्री.राकेश पाटील व पोकॉ.भुषण खलाणेकर हे तक्रारदार यांचे मोटार सायकलीने शिंदखेडा गावाचे अलीकडे असलेल्या एस.एस.व्ही.पी.एस.कॉलेजचे जवळ पोहोचलो. तेथे तक्रारदार, दोन्ही पंच व स्टाफला आवश्यक सुचना दिल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.राकेश पाटील व पंच नं.१ श्री.भोये यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह लोकसेवक अभियंता श्री.शरद पाटील यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचे मोटार सायकलीने बस स्थानक शिंदखेडा येथे पाठविले असता, तेथे तक्रारदार यांची लोकसेवक अभियंता शरद पाटील यांचेशी भेट होवुन तक्रारदार यांचे कामा संदर्भात चर्चा झाली. चर्चेदरम्यान लोकसेवक शरद पाटील यांनी तक्रारदार यांचे आईस एमआरईजीएस योजने अंतर्गत मंजुर सिंचन विहीरीचे मंजुर रक्कम १,१३,१२०/- रुपयें काढुन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ४,०००/-रु. लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम दि. १९/०२/२०१९ रोजी धुळे शिरपुर राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ वरील बाभळे फाटयाजवळ आणुन देण्याचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील संभाषणावरुन स्पष्ट झाल्याने दि. १९/०२/२०१९ रोजी सापळा कारवाईचा निर्णय घेवुन तक्रारदार व दोन्ही पंचांना सुचना दिल्या. तसा दि.१८/०२/२०१९ रोजी सविस्तर पडताळणी पंचनामा शिंदखेडा येथील एस.एस.व्ही.पी.एस कॉलेजचे आवारात झाडाखाली करण्यांत आला आहे.

आम्ही दिलेल्या सुचनेनुसार दि.१९/०२/२०१९ रोजी दोन्ही पंच ब्युरो कार्यालयात हजर झाल्यानंतर धुळे शिरपुर राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ वरील बाभळे फाटयाजवळ जावुन सापळा कारवाई

Scanned by CamScanner

करावयाची असल्याने सापळा कारवाईचे साहित्यासह खाजगी वाहनाने निघुन बाभळे फाटयाचे अलीकडे असलेल्या शिरपुर राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ वरील वालखेडा फाटयाजवळ असलेल्या गिरनार हॉटेलजवळ रस्त्याच्या कडेला आलो. तेथे तक्रारदार श्री.राकेश पाटील हजर होते. त्यांना खाजगी वाहनात बसवुन घेतले.

त्यानंतर तक्रारदार श्री.राकेश पाटील यांनी लाच कामी दयावयाचे ४,०००/-रु. हजर केले. त्यात २०००/- रुपये दराची एक व ५००/-रु. दराच्या चार चलनी नोटा होत्या. त्यानंतर खाजगी वाहनात काळया कपडयाद्वारे कृत्रीम अंधार करुन, पोकॉ. प्रशांत चौधरी यांनी अॅन्थ्रासिन पावडर व अॅल्ट्राव्हाईलेट दिव्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना तक्रारदार व पंचा समक्ष अॅन्थ्रासिन पावडर लावली. दरम्यान तक्रारदार श्री. राकेश पाटील यांनी कळविले की, लोकसेवक श्री. शरद पाटील यांनी त्यांना फोन करुन दि. १९/०२/२०१९ रोजी सोनगीर फाटयाचे पुलाखाली येणे बाबत कळविले नंतर आम्ही दोन्ही पंच, तक्रारदार व स्टाफ अशांना सापळा कारवाईच्या योग्य त्या सुचना देवुन सापळा कारवाईचे आयोजन केले. तसा दि.१९/०२/२०१९ रोजी सविस्तर सापळापुर्व पंचनामा शिरपुर राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ वरील वालखेडा फाटयाजवळ असलेल्या गिरनार हॉटेलजवळ रस्त्याच्या कडेला करण्यांत आला आहे.

त्यानंतर तक्रारदार व पोकॉ. भुषण खलाणेकर हे तक्ररदारचे मोटार सायकलीने व आम्ही, पोलीस उप अधिक्षक श्री. सुनिल कुराडे, दोन्ही पंच, व स्टाफ असे खाजगी वाहनाने निघुन सोनगीर फाटयाजवळ आलो. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच नं.१ श्री.भोये यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व लाचेच्या रकमेसह लोकसेवक अभियंता श्री.शरद पाटील यांची भेट घेण्यासाठी सोनगीर फाटयाचे पुलाखाली रवाना केले. दरम्यान आम्ही, पंच नं.२ श्री.राहुल पाटील व सापळा पथकातील कर्मचारी सदर ठिकाणी व आजुबाजुच्या आवारात उभे असलेल्या लोकांचे गर्दीत मिसळुन तक्रारदार व पंच नं.१ श्री.भोये यांचेवर लक्ष ठेवुन दबा धरून थांबुन राहिलो.

त्यानंतर तक्रारदार यांनी लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा केला. सदर इशारा मिळताच आम्ही, पंच नं.२ श्री.राहुल पाटील व सापळा पथकातील कर्मचारी असे सक्रीय होवुन, तक्रारदार श्री.राकेश पाटील व पंच नं.१ श्री.भोये यांचेजवळ आलो. सदर ठिकाणी तक्रारदार व पंच नं. १ यांनी दाखविलेल्या इसमाचे आमचे सुचनेवरुन पोना.संदीप सरग व पोना.कृष्णकांत वाडीले यांनी अनुक्रमे उजवा व डावा हात मनगटापासुन पकडुन, त्यांना अटकावुन ठेवले. त्याच दरम्यान पोकॉ. भुषण खलाणेकर यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून तो बंद करून स्वत:चे ताब्यात घेतला, त्यावेळी १३.३१ वाजले होते.

त्यानंतर अटकाविलेल्या इसमास माझी व स्टाफची ओळख देवून त्यांना त्यांचे नाव गावं विचारता, त्यांनी त्यांचे नाव शरद फकिरा पाटील वय-५२, कनिष्ठ अभियंता, लघु सिंचन विभाग, पंचायत समिती, शिंदखेडा जि. धुळे रा.गांधी चौक, देसले वाडा, शिंदखेडा जि. धुळे असे सांगितले.

त्यानंतर आम्ही, पंच नं.१ श्री. भोये यांना, लाचेच्या नोटा तक्रारदार यांचे कडुन कोणी घेतल्या व कोठे ठेवल्या आहेत असे विचारता, त्यांनी त्यांचे समोर उभ्या असलेल्या व अटकावलेल्या इसमाकडे बोट दाखवुन याच शरद पाटील यांनी तक्रारदार यांना आणले आहेत का असे विचारुन लाचेची मागणी केली असता, तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टचे उजवे बाजुचे खिशातुन लाचेची रक्कम ४,०००/- रू. काढुन ती शरद पाटील यांचे समोर धरली असता, शरद पाटील यांनी सदर लाचेची रक्कम त्यांचे डाव्या हाताने स्विकारून, त्यांचे नेसुस पॅन्टचे डावे बाजुकडील खिशात ठेवुन घेतली. त्यानंतर तक्रारदार यांनी लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा दिला. अशी हकीकत सांगितली. दरम्यान सदर ठिकाणी लोकांची गर्दी वाढल्याने आरोपी लोकसेवक शरद पाटील यांना खाजगी वाहनात बसवुन आम्ही, दोन्ही पंच व स्टाफ असे तसेच तक्रारदार श्री.राकेश पाटील हे त्यांचे मोटार सायकलीने सोनगीर पोलीस स्टेशनला आलो. त्यानंतर तक्रारदार यांना सदर पोलीस स्टेशन मधील सी.सी.टी.एन.एस कक्षाचे बाहेर थांबण्यास सांगीतले.

त्यानंतर सी.सी.टी.एन.एस कक्षाचे दरवाजा व लाईट बंद करुन काळया कपडयाद्वारे कृत्रीम अंधार करुन लोकसेवक शरद पाटील यांचे दोन्ही हातावर व कपडयावर अ.व्हा. दिव्याचा प्रकाश टाकुन

Scanned by CamScanner

पाहिले असता, त्यांचे डावे हाताचे बोटांचे पेऱ्यांवर व तळव्यावर ठिकठिकणी अ.पा.ची फिकट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर लाईट चालु करून पुर्ववत उजेड केला.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच नं.२ श्री. राहुल पाटील यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारून पॅन्टच्या डावे बाजुकडील खिशात ठेवलेली लाचेची रक्कम काढुन मोजली असता त्यात २,०००/- रु. दराची एक व ५००/- रु. दराच्या चार चलनी नोटा असे एकुण ४,०००/-रु. मिळुन आले. त्यानंतर कार्यालयाचा लाईट बंद करुन काळया कपडयाद्वारे कृत्रीम अंधार करुन, सदर लाचेच्या नोटांवर अ.व्हॉ. दिव्याचा प्रकाश टाकून पाहिला असता, त्या नोटांवर दोन्ही बाजुस क्रॉस आकाराची अ.पा.ची फिकट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर लाईट चालु करून पुर्ववत उजेड करण्यात आला. त्यानंतर पंच नं.१ श्री. भोये व पंच नं.२ श्री. राहुल पाटील यांचेकरवी सदर नोटांचे क्रमांक हे सापळा पुर्व पंचनाम्यात नमुद असलेल्या नोटांच्या क्रमांकाशी पडताळुन पाहिले असता, ते एकच असल्याची खात्री झाली.

सदर नोटा एका खाकी पाकीटात टाकुन सदर पाकीट पंचासमक्ष सिलबंद करुन सदर पाकीट तपासकामी ताब्यात घेतले. लोकसेवक शरद पाटील यांची नेसुस पॅन्ट जप्त करून त्यांना पर्यायी पॅन्ट दिली.

त्यानंतर तक्रारदार यांना आत बोलावुन कार्यालयाचा दरवाजा व लाईट बंद करुन काळया कपडयाद्वारे कृत्रीम अंधार करुन त्या अंधारात तक्रारदार श्री. राकेश पाटील यांचे दोन्ही हात व कपडयावर अ.व्हा. दिव्याचा प्रकाश टाकुन पाहिला असता, त्यांचे उजवे हाताचे पाचही बोटांचे पेऱ्यावर व तळव्यावर तसेच पॅन्टचे उजवे बाजुचे खिश्याचे कडांवर व आतील बाजुस ठिकठिकाणी अ.पा.ची फिकट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर कक्षाचा दरवाजा व लाईट सुरू करून पुर्ववत उजेड केला. दरम्यान लोकसेवक शरद पाटील यांचे वरिष्ठ अधिकारी श्री. शिवदे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती शिंदखेडा जि. धुळे यांना भ्रमणध्वनीद्वारे सापळा कारवाईची माहिती कळविली.

दरम्यान आरोपी लोकसेवक शरद पाटील यांचे शिंदखेडा येथील राहते घराची घरझडती घेणेकामी श्री.सुनिल कुराडे, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे यांना सी.आर.पी.सी. कलम १६६ प्रमाणे ठराव देण्यात आला. त्यानंतर लोकसेवक शरद पाटील यांनी लाचे संदर्भात स्वेच्छेने स्व:हस्ताक्षरात पंचासमक्ष त्यांचे निवेदन लिहुन दिले.

सदर यशस्वी सापळा कारवाई पंचनामा दि.१९/०२/२०१९ रोजी सोनगीर पोलीस स्टेशन येथील सीसीटीएनएस कक्षात लॅपटाप संगणकावर पुर्ण करण्यात आला आहे.

तरी यातील तक्रारदार श्री. राकेश पतिंग पाटील यांचे आईस एमआरईजीएस योजने अंतर्गत मंजुर सिंचन विहीरीचे मंजुर रक्कम १,१३,१२०/- रुपये काढुन देण्यासाठी आरोपी लोकसेवक शरद फकिरा पाटील कनिष्ठ अभियंता, लघु सिंचन विभाग, पंचायत समिती, शिंदखेडा जि. धुळे यांनी तक्रारदार यांचेकडे दि.१८/०२/२०१९ रोजी ४,०००/- रु. लाचेची मागणी करुन, सदर लाचेची रक्कम दि.१९/०२/२०१९ रोजी सोनगीर फाटयाचे पुलाखाली पंच साक्षीदार समक्ष स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

अशा प्रकारे आरोपी लोकसेवक शरद फकिरा पाटील वय-५२, कनिष्ठ अभियंता, लघु सिंचन विभाग, पंचायत समिती, शिंदखेडा जि. धुळे यांनी स्वत:चे आर्थिक फायदयासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक (संशोधन) अधिनियम सन २०१८ चे कलम ७ प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

Scanned by CamScanner